


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ....कथा....
दा. क्र. २०९८८





# विज्ञान कथा





BVBK-0402798

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई



२७८८
९/८/८३



# विज्ञान कथा

‘बाल-कुमार साहित्य स्पर्धा’


८ वी ते १० वी गटातील विजेत्या कथा


केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

BVBK-0402798

किंमत ५ रुपये

© केशव भिकाजी ढवळे





पहिली आवृत्ती : १९८३
दुसरी आवृत्ती : १९८७
तिसरी आवृत्ती : १९८९

| मुद्रक | प्रकाशक |
| --- | --- |
| प्र. पु. भागवत | धनंजय बाळकृष्ण ढवळे |
| मौज प्रिंटिंग ब्यूरो, | केशव भिकाजी ढवळे |
| खटाववाडी, | पहिली भटवाडी, |
| मुंबई ४००००४ | मुंबई ४००००४ |

# स्पर्धकांचे अभिनंदन !

'केशव भिकाजी ढवळे' जन्मशताब्दि-निमित्ताने आम्ही ११ जुलै ८२ रोजी 'बाल-कुमार साहित्य स्पर्धा' जाहीर केली होती. त्यात ५ वी ते ७ वी आणि ८ वी ते १० वी असे दोन गट करण्यात आले होते. स्पर्धेची मुदत वाढवूनही अपेक्षित प्रतिसाद मिळू शकला नाही. प्रत्येक गटासाठी ५०।५० पारितोषिके जाहीर केलेली होती परंतु ५०।५० कथाही आल्या नाहीत.

आम्ही ८ वी ते १० च्या गटातून या पाच कथा निवडल्या आहेत. पहिल्या तीन क्रमांकाना योग्य अशा कथा नाहीत. त्यामुळे या पाचही कथा 'उत्तेजनार्थ' या सदरातील आहेत. विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन !

ज्या स्पर्धकांनी आमच्या या स्पर्धेत भाग घेतला त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

या कथा वाचल्यानंतर अनेक मुलांच्या अंगात आपणही कथा लिहावी अशी उर्मी येईल. त्यांनी आपली कथा अवश्य लिहून काढावी. आपल्या पालकांना, शिक्षकांना दाखवावी आणि असे जर घडले तरच या स्पर्धेचा आणि पुस्तकाचा खरा उद्देश सार्थ होईल.

—प्रकाशक

# कथानुक्रम


१. **सौरशक्ती यंत्र** ५
कु० कीर्ती काळे
C/o डॉ० बी० एन० काळे
६ नवनिर्माण को-ऑप० हाऊसिंग सोसायटी,
प्रताप नगर, नागपूर ४४० ०१०

२. **यंत्रमानवाची गोष्ट** ९
कु० वैशाली श्रीनिकेतन ढवळे
२३०|१२|५ शुक्रवार पेठ
अकरा मारुती रोड
पुणे ४११ ००२

३. **अवकाशयानाशिवाय अंतराळ सफर** १२
कु० अतुल गणेश दीक्षित
१, पल्लवी हाऊसिंग सोसायटी,
शीतल बंगला, शिवाजी नगर,
पुणे ४११ ०१६

४. **उल्कापात** १९
कु० वामन गजानन पारखी
१४|१९४ लोकमान्य नगर,
महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड,
पुणे ४११ ०३०

५. **अदृष्य संकट** २५
कु० अजय कमलाकर बेलन
साने गुरुजी पथ, गुरुवार वॉर्ड,
मालेगाव-४२३ २०३ (जि० नाशिक)



# १.

# सौरशक्ती यंत्र

आमच्या गावातील जोश्यांचा बंडू लहानपणापासूनच धडपड्या, हुशार. विज्ञानात M. sc. चांगला फर्स्ट-क्लास पास झालेला, पण नोकरी कुठेच मिळत नाही म्हणून त्रस्त झालेला. रोज़ बिचारा कुठेतरी इंटरव्ह्यूला जातो आणि मग संध्याकाळी निवडीची आशा न ठेवता वैतागून घरी येतो.

एक दिवस त्याचे काका त्याच्याकडे आले. त्याने आपलं नेहेमीचं, 'नोकरी मिळत नाही'चं रडगाणं त्यांना ऐकवलं. आणि काका एकदम म्हणाले, "अरे, नोकरीत काय ठेवलंय? एवढा M. Sc. झालास. दुसरा काही विचार कर, काही शोध. त्या नोकरीपायी एवढा निराश होऊन आपल्या शिक्षणाला दोष देऊ नकोस." बंडूला काकांचं म्हणणं पटलं.

'खरंच, ह्या एडिसन, ग्रॅहम बेल यांसारख्या लोकांनी किती प्रयत्न करून नवेनवे शोध लावले. एडिसन तर किती वाईट परिस्थितीतून लखपती झाला. हे सगळं का? त्यांनी खूप विचार केला असला पाहिजे. त्यामुळे मनातील एक सुप्तशक्ती जागृत होते. खरंच, आपणही काही शोधू शकतो.' असलाच विचार बंडू रात्री बराच वेळ गच्चीत अंथरुणावर पडून करत होता.

रात्री उशीरा झोपलेल्या बंडूला सकाळी पूर्वेकडून आलेल्या सूर्याच्या किरणांनी जागे केले. आणि बंडूच्या डोक्यात एकदम विचार चमकला.

'आपण जर ह्या सूर्याच्या किरणांवरच प्रयोग केला तर!' आणि ह्याच विचारात बंडू काही काही प्रयोग करून पहायला लागला.

"अरे वा! सक्सेसफुल."

"अरे, काय सक्सेसफुल झालं?" काकांनी मोठ्या उत्सुकतेने त्याला विचारलं.

"अहो, माझा शोध. काका, आता बघाच, आठ दिवसांत नोकरी मिळवून दाखवतो!"

बंडूने सौरशक्तीवर चालणारं एक यंत्र तयार केलं होतं. ते यंत्र सूर्यकिरणे पकडून ठेवायचं आणि त्याच्या बळावर समोरच्या व्यक्तीच्या मनात काय आहे, ते सांगायचं. बंडू खूप खूष झाला.


दुसऱ्याच दिवशी आलेल्या पत्राने त्याच्या आनंदात भर घातली. पत्रात लिहिलं होतं, "You are requested to come to the office, on Saturday, where your interview will be taken." आणि असलंच काहीतरी.

शनिवारी ते यंत्र घेऊन बंडू त्या ऑफिसमध्ये गेला. तेथे बरेच तरुण आलेले होते.

बंडूला आत बोलावलं गेलं. तेथे गेल्यावर यंत्राद्वारे मिळालेल्या सुचनेद्वारे बंडूने परीक्षकांच्या मनातले प्रश्न जाणून घेतले आणि त्यांनी प्रश्न विचारल्या-नंतर भराभर उत्तरं दिली. त्याच्या उत्तरांनी खूष होऊन त्याला नियुक्त करण्यात आलं. मोठ्या फॅक्टरीत नोकरी लागल्याने बंडू खूष होता.

रोज त्या यंत्राने तो वरिष्ठांच्या मनात काय आहे ते ओळखून बरोबर तेच काम करायचा. त्यामुळे थोड्याच दिवसांत वरिष्ठांची त्याच्यावर मर्जी बसली.

इकडे सौरशक्तीवरचे त्याचे प्रयोग चालूच होते. त्याने दुसरं यंत्र फॅक्टरीतल्याच एका मशीनवर बसवलं. ते मोठं यंत्र सौरशक्ती साठवून पुरवू शकत होतं आणि ते त्या विजेवर चालणाऱ्या मशीनवर बसवलं होतं.




ह्या शोधामुळे फॅक्टरीचं उत्पन्न दुपटीने वाढलं. तोट्यात चाललेल्या फॅक्टरीला नफाच नफा मिळायला लागला. कारण सौरशक्ती मिळवायला पैसे पडत नव्हते. शिवाय पूर्वी विजेच्या लहरीपणामुळे फॅक्टरीचा जीव असलेलं ते मशीन कित्येक तास बंद असायचं.

बंडू तर त्या सौरशक्तीने वेडाच झाला होता. तो रोज नवेनवे प्रयोग करायचा. आणि एक दिवस त्याने एक जगावेगळं यंत्र बनवलं. हे यंत्र पण सौरशक्ती साठवायचं आणि त्याच शक्तीवर मोटार, ट्रक पळवायचं. पेट्रोलटंचाईच्या काळात असं यंत्र शोधल्यामुळे बंडूची गाडी तावात पळत होती.

गावात गॅस-टंचाई. त्यामुळे सर्वच गृहिणी वैतागलेल्या. पण बंडूची आई मात्र खूष होती. त्यांच्या शेजारणीने त्यांना कारण विचारलं तर त्या म्हणाल्या, "अहो, आमच्या बंडूने ती एक शेगडी बनवली आहे. रोज सकाळी सूर्य उगवल्यावर बंडू अर्धा तास ती वर गच्चीत नेऊन ठेवतो. आणि मग माझा सगळा स्वयंपाक त्या शेगडीवर मी शांतपणे करू शकते."

म. ग्रं. सं.
२७८८
ला. ला.



# यंत्रमानवाची गोष्ट

आज सकाळपासून अभय खुषीत होता. कारण आज त्याचे काका येणार होते. शिवाय आज त्याचा वाढदिवसही होता.

संध्याकाळी अभयच्या वाढदिवसाच्या निमित्ताने खूप पाहुणे आले होते. सगळ्यांकडून अभयला अनेक प्रकारच्या भेटी मिळाल्या. पण अभयचे काका अशी सामान्य भेट देणार नव्हते. सगळ्यांपेक्षा अतिशय वेगळी आणि अनपेक्षित अशी ती वस्तू होती. रात्री अभयचे काका एका मोटारीतून काहीतरी घेऊन आले. ती अभयला द्यायची वस्तू होती. अभयचे काका शास्त्रज्ञ होते. म्हणजे अर्थातच ती भेट अभयच्या काकांनी तयार केलेली असणार. आणि ती वस्तू होती यंत्रमानव. अभयच्याच काकांनी ती तयार केलेली होती. अभयला ही काकांनी दिलेली वेगळीच भेट खूप आवडली. आता ही वस्तू आपल्या मित्रांना कधी दाखवतो असे अभयला झाले होते.

त्या दिवशी रविवार होता. आई, बाबा आणि काका संध्याकाळी फिरायला गेले होते. अभयने ही सुसंधी सोडली नाही. त्याने सगळ्या मित्रांना आपल्या छोट्याशा प्रयोगशाळेत जमा केले. आणि मग हळूच यंत्रमानवावरचा पडदा सरकवला. सगळेजण यंत्रमानवाचे ते विचित्र रूप पाहून आश्चर्यचकितच झाले. प्रथम अभयने सगळ्यांना एके ठिकाणी बसवले. आणि मग एक बटण दाबले, "आईऽऽऽऽ ग" महेशच्या एक थोबाडीतच बसली. खरे म्हणजे अभयने, यंत्रमानवाने आपल्या मित्रांचे

बंडूचं ते मनकवडं यंत्र खूप गाजलं. ते नेहेमी त्याच्याजवळच असायचं. त्याने तो इतरांच्या मनातलं जाणायचा. पण नंतर नंतर त्याला त्या यंत्राने लोकांच्या मनातलं जाणल्याने खूप वाईट वाटायचं. कारण सगळेच जण त्याच्यावर जळत असायचे. वरकरणी म्हणायचे, "वा, बंडोपंत, काय हुशार आहात हो!" पण मनातून म्हणायचे, "कसला हुशार, बुद्दू तर आहे! लेकाचा, नशिबाने खैरात केली म्हणून एवढा पैसा मिळवतोय." फॅक्टरीतले लोकही खूप जळायचे, "काय लेकाचा कानामागून आला अन् तिखट झाला. वरपर्यंत वशिला लावलाय." हे सगळं ऐकून बंडू वैतागला. "माणसाच्या मनातलं जाणून घ्यायचा कोणीही प्रयत्न करू नये. माणसाचं मन अगम्य आहे आणि ते तसं असलेलंच बरं. वरकरणी स्तुती करणारे मनातून जळत असतात, दुःखी असणारे चैन करत असतात आणि सुख, हास्य चेहेऱ्यावर विलसत ठेवणारे मनातून खूप दुःखी असतात. छे, छे, छे, आपण हे यंत्र केलंच नसतं तर बरं झालं असतं!" असं म्हणून बंडूने ते यंत्र नदीत फेकून दिलं.

आता बंडू सुखी आहे. स्तुती करणाऱ्यांची स्तुती त्याला खरी वाटते आणि त्या स्तुतीचा आनंद तो घेऊ शकतो.

कु. कीर्ती काळे,
C/o डॉ० बी० एन० काळे
६, नवनिर्माण को-ऑप०
हाऊसिंग सोसायटी,
प्रतापनगर, नागपूर ४४० ०१०

स्वागत करावे म्हणून ते बटण दाबले होते. पण अभयच्या चुकीमुळे त्याला स्वतःलाही एक थोबाडीत खावी लागली. (अर्थात महेशच्या हातची हं!) यंत्रमानवाने पहिल्याच भेटीत चांगली झलक दाखवली होती! पण शेवटी अभयने महेशच्या हातापाया पडून त्याला कसेबसे मनावले.

अभयने आपल्या खास मित्रांसाठी सरबत तयार केले होते. आता अभयने दुसरे बटण दाबले. आणि काय आश्चर्य! तो यंत्रमानव हळू हळू पुढे सरकायला लागला. स्वयंपाकघरातून सगळ्यांसाठी सरबत घेऊन आला. ह्या वेळेला मात्र सुदैवाने कोणतीही चूक झाली नाही. मग अभयचे मित्र यंत्रमानवावर अगदी खूष झाले.

थोड्या वेळाने अभयचे सगळे मित्र घरी जायला निघाले. त्यांच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी अभयने यंत्रमानवाचे एक बटण दाबले, त्याबरोबर यंत्रमानवाने पटकन शिरीषचा हात पकडला. आता हात सोडवायचे बटण अभयला माहित नव्हते. मोठा बिकट प्रसंग होता. सगळ्यांचेच चेहरे अगदी पडले होते. शिरीष आपला हात सोडवून घेण्यासाठी धडपड करत होता. पण काका आल्याशिवाय शिरीषचा हात सुटणे अशक्य होते. शेवटी रात्री काका आल्यावर मगच शिरीषची सुटका झाली.

ह्या प्रसंगामुळे अभयला चांगली अद्दल घडली होती. त्यामुळे काकांच्या परवानगीखेरीज तो यंत्रमानवाला हात लावत नव्हता.


पण तेरड्याचा रंग तीन दिवस ह्याप्रमाणे चौथ्या दिवशी अभयला यंत्रमानवाकडून काहीतरी काम करून घेण्याची इच्छा झाली. यंत्रमानव घर साफ करू शकतो हे त्याला माहीत होते. पण ते बटण माहित नव्हते. आणि काका पण घरात नव्हते. पण त्याने उगाचच एक बटण दाबले. आणि यंत्रमानवाच्या हातात एक झाडू दिला. तर तो यंत्रमानव घरभर धावू लागला, जिकडे तिकडे झाडू मारू लागला. त्याने घरातले सगळे सामान उडवले. अभयला तर त्याला आवरणे अशक्यच होते. आणि ह्याही वेळेला काका आल्यावर मगच तो यंत्रमानव थांबू शकला. पण ह्या वेळेला

घरातल्या सामानाचे खूप नुकसान झाले. त्यामुळे अभयला भरपूर खाऊ मिळाला (पाठीत).

आता अभयला हळूहळू बटणांची माहिती झाली होती. त्यामुळे त्याला यंत्रमानवाशी केव्हाही खेळायला परवानगी मिळाली होती. आता अभयला आपणही ह्यात काहीतरी सुधारणा कराव्या असे वाटू लागले. आता आपल्या रोजच्या कामात यंत्रमानव कसा उपयोगी पडू शकेल याबद्दल अभय विचार करू लागला. विचार करता करता अभयला एक कल्पना सुचली : जर यंत्रमानव अभ्यास करू शकेल अशी सोय केली तर किती मजा येईल! म्हणून रात्रंदिवस विचार करून शेवटी त्याने तसे बटण तयार केले.

सुट्टी संपली, शाळा सुरू झाली होती. आता अभ्यासही सुरू झाला होता. पण शाळा सुरू झाली तरी अभय मात्र खुषीत होता. शाळा सुरू होऊन महिना झाला. म्हणून एक दिवस अभयने ते बटण दाबले. आणि त्या दिवशी अभयचा गृहपाठ वीस मिनिटांत पूर्ण झाला. पण अभयने यंत्रमानवाचा हात थांबवायची सोय केली नव्हती. शेवटी त्याला ते बटण काढूनच टाकावे लागले. म्हणजे तो स्वतःची सोय करायला गेला, पण काहीच जमले नाही.

आता अभय या यंत्रमानवाला अगदी कंटाळून गेला होता. त्याच्याकडून कोणतेही काम करायला घेतले की ते दुप्पटच होत होते. पण एक दिवस मात्र हा यंत्रमानव चांगलाच उपयोगी पडला. दुपारी अभयची आई वामकुक्षी करीत होती. अभय खोलीत काहीतरी करत होता. काही वेळाने अंगणात काहीतरी वाजले. एक चोर गॅलरीतून घरात येत होता. अभयने हळूच यंत्रमानवाचे एक बटण दाबले. आणि हळू हळू तो यंत्रमानव पुढे सरकला आणि त्याने चोराची मानच पकडली. तोपर्यंत अभयने थोडेफार लोक जमा केले, पोलिसांना बोलावले, आणि चोराला पकडले. त्या दिवशी यंत्रमानवामुळेच चोर पकडता आला. त्यामुळे अभय आता त्याच्यावर कधीही रागवत नाही.




अशा प्रकारे यंत्रमानव अभयला खूप गोष्टींत उपयोगी पडत होता. आता अभयने स्वतःही त्यात खूप सुधारणा केल्या होत्या. पण त्यामुळे अभय खूप आळशी बनला होता. कोणतीही गोष्ट करताना अभयला त्याची गरज लागत होती. पण शेवटी अभयच्या धांदरटपणामुळे आणि जास्त वापरामुळे यंत्रमानवात बिघाड निर्माण झाला. आणि यंत्रमानव वापरणे अशक्यच झाले. अभयला स्वतःच्या आळशीपणामुळे एक सुंदर भेट मात्र गमवावी लागली.


कु. वैशाली श्रीनिकेतन ढवळे
२३०।१२।५ शुक्रवार पेठ
अकरा मारुती रोड,
पुणे ४११ ००२.



# ३.

# अवकाशयानाशिवाय अंतराळ-सफर

आज सकाळपासूनच जगप्रसिद्ध संशोधक राजेश पटवर्धन आनंदी होते. त्यांना मिळालेल्या यशाची अजून कोणालाही कल्पना नव्हती. राजेश पटवर्धन हे गेली १५ वर्षे एका संशोधनात व्यग्र होते. मात्र त्यांचा विषय फक्त चारजणांनाच माहिती होता. ते चारजण म्हणजे स्वतः राजेश, राजेश यांच्या संशोधन संस्थेचे प्रमुख, भारताचे विज्ञान संशोधन मंत्री व भारताचे पंतप्रधान हे होत.

राजेश यांच्या संशोधनाचा विषय असा होता :

राजेश यांच्या मते अंतराळातील कृष्णविवरांमधून येणारे अनेक किरण हे आपापल्यापरीने नानाविध शक्तींनी युक्त असतात. त्यांतल्याच एका प्रकारचे किरण जर कोणत्याही वस्तूवर वातावरणरहित अवस्थेत पडले तर त्या किरणांच्या परिणामामुळे त्या वस्तूची हुबेहूब प्रतिकृती तयार होते व ती आपण केलेले हुकूम पाळू शकते.—असा राजेश यांचा सिद्धान्त होता.

राजेश यांनी प्रथम सात ते आठ वर्षे या विषयावरील माहिती निरनिराळ्या भाषेतील पुस्तकांमधून मिळवून आपल्या संशोधनाची रूपरेषा तयार केली. व नंतर ते आपल्या संशोधनाची पंतप्रधानांना कल्पना देऊन त्यांच्याकडून आर्थिक व तांत्रिक साहाय्य मागण्यासाठी दिल्ली येथे गेले. तेथे त्याने विज्ञान संशोधन मंत्र्यांच्या उपस्थितीत आपल्या संशोधनाबद्दलची

सर्व माहिती पंतप्रधानांना पारदर्शिकांद्वारे समजावून दिली. नंतर विज्ञान संशोधन मंत्र्यांनी त्यांना तांत्रिक मदतीचे आश्वासन दिले व पंतप्रधानांनी त्यांस आर्थिक मदत मिळवून देऊ असे सांगितले. नंतर पाच ते सहा दिवसांतच त्यांनी मंत्र्यांच्याकडे आपणास हव्या असणाऱ्या साहित्याची यादी दिली व त्यानंतर चार ते पाच महिन्यांतच त्यांना ती साधने मिळाली.

अखेर आज पंधरा वर्षांच्या खडतर कष्टांनंतर व प्रदीर्घ प्रयत्नांनंतर त्यांनी सायकल, कुत्रा आणि एका अंतराळवीराची हुबेहूब प्रतिकृती (आपण तिला सोयीसाठी 'अवकाशप्रतिमा' म्हणू.) तयार केली आणि त्याच वेळी तिच्यात (अवकाशप्रतिमेत) प्रवेश करून को[illegible]ा येते, हा नवीन शोध त्यांना लागला. त्याचवेळी त्यांनी सर्व शास्त्रज्ञांची एक सभा भरवून भारताच्या मालकीच्या अवकाशात फिरणाऱ्या उपग्रहांपैकी पाच उपग्रहांच्या अवकाशप्रतिमा तयार करायचे ठरवले.

राजेश पटवर्धनांचा भाचा सुहास हाही या विषयात रस घेत होता. त्याने अंतराळ विज्ञानाचा पूर्ण व सखोल अभ्यास केला होता. इतकेच नव्हे तर तो भारताचा एक नावाजलेला अंतराळवीर होता. त्याने मामा-कडून (म्हणजे राजेशकडून) अवकाशप्रतिमा तयार करण्याच्या यंत्राची सर्व माहिती मिळवली होती. आणि त्याच्या सहाय्याने त्याने एका संपूर्ण अंतराळयानाची अवकाशप्रतिमा मिळवण्याचे ठरवले व त्यात तो सफल झाला आता त्याला स्वतःच्याच अवकाशप्रतिमेत वास्तव्य करून अंतराळात झेप घेऊन भटकावेसे वाटत होते. त्याने आपली ही इच्छा मामाला सांगितली व मामाने ते ऐकून घेतले.

त्याच रात्री राजेशना एक कल्पना सुचली. ती जर अंमलात आणली गेली असती तर—अंतराळात यानाशिवाय माणसांना वास्तव्य करावयास लावणारा व तेथे मानवाच्या याने पाठवण्याच्या [समनुष्य, याने] मर्यादे-पलिकडे मानवाला पाठवणारा भारत हा पहिला देश ठरला असता.

ती कल्पना अशी : भारतातील काही निष्णात अंतराळवीरांना अंतराळात घेऊन त्यांच्या अवकाशप्रतिमा तयार करवून त्यातून अवकाश-प्रवासास पाठवायचे व मोलाची माहिती मिळवायची.

राजेश यांनी ही योजना पंतप्रधानांसमोर मांडली. सर्व शास्त्रज्ञांकडून त्या योजनेचे स्वागत झाले व ती योजना राबवायचे ठरले. दोन दिवसांच्या चर्चेत आपल्या योजनेतील मुख्य कार्यक्रम राजेशांनी सर्वांना समजावून दिली व गुप्तपणे योजनेची तयारी सुरू झाली.

या योजनेसाठी सर्वांनी विचारविनिमयाने पाच जणांची निवड केली होती. त्यांचा योजनाप्रमुख म्हणून सर्वांनी एकमताने श्री. सुहास रणदिवे यां[illegible] केली. इतर चार जणांची नावे खालीलप्रमाणे :

१) [illegible]ोहनकुमार सिंग


२) [illegible] प्रताप अरोरा

३) श्री हृषीकेष बसू

४) श्री वेंकटरमण।

त्यांच्या जाण्याचा दिवस ठरला. त्यांना निघायला अजून तीन महिने अवकाश होता. या तीन महिन्यांच्या काळात त्या पाच जणांना राजेशनी अवकाशप्रतिमेतील वास्तव्याबद्दलची योग्य माहिती दिली. तीन महिने चटकन संपले. जाण्याचा दिवस उजाडला. त्या दिवशी ठरलेल्या वेळी S L V-4 ने या पाच अंतराळवीरांना घेऊन उड्डाण केले. त्यांच्या-बरोबर सुरक्षिततेसाठी एक स्पेश शटल (फक्त आठ जण बसू शकणारे) दिले होते. शिवाय त्यात खाद्यपदार्थही होते आणि प्यायचे पाणीही होते.

अवकाशात ठरलेल्या ठिकाणी ते यानातून उतरून अवकाशात स्थिर झाले व काही मिनिटांतच त्यांना राजेश यांचा संदेश मिळाला की त्यांच्या अवकाशप्रतिमा तयार आहेत व त्यातून ते बाहेर आलेले नाहीत, तेव्हा ते तसेच आता कोठेही जाऊ शकतात. त्या पाचजणांचा अंतराळ-वाहना-शिवाय व अंतराळातील अभूतपूर्व प्रवास सुरू झाला. त्यांनी इतक्या वेगाने



प्रवास केला की तिसऱ्या दिवशी ते प्लुटोपर्यंत येऊन पोहोचले. आता येथे अंतराळयानावरील मानवी नियंत्रण संपत होते. येथून पुढे त्यांच्या खऱ्या अद्‌भुत प्रवासास सुरुवात होणार होती. एका अगम्य व अज्ञात विश्वात ते प्रवेशणार होते व त्याच्या रहस्याची पाने हळू हळू त्यांच्यासमोर उलगडली जाणार होती.

आता त्यांचा प्लुटोपुढील म्हणजेच दुसऱ्या सूर्यमालेतील प्रवास सुरू झाला होता. पृथ्वीवरील संदेश क्षीण क्षीण होत जाऊन मिळेनासे झाले तरी त्यांच्या प्रवासात कोठेही खंड पडला नाही. दोन दिवसांनी वाटेत त्यांना चार ग्रह दिसले, पण तेही आपल्या गुरू, शुक्र, शनीप्रमाणे उजाड. शेवटी पृथ्वीपासून सहा प्रकाशवर्षे दूर आल्यावर त्यांना विचित्र संदेश ऐकू येऊ लागले. नंतर एक तोडक्यामोडक्या इंग्रजी भाषेत त्यांना संदेश मिळाला तो संदेश त्यांना जवळच्याच एका ग्रहावर येण्यास सांगत होता. तो ग्रह अतिशय लहान होता. त्याचा व्यास चंद्राच्या एक तृतीयांश होता. त्या

पाच जणांना संदेश देणाऱ्या व्यक्तीने त्या ग्रहावर येताना पुरेसा ऑक्सिजन आणावयास सांगितला. त्या पाच जणांनी तेथे जाण्याचे ठरवले. त्यांनी त्या ग्रहाच्या जवळ गेल्यावर एक विचित्र उडती तबकडी त्यांच्याकडे येताना पाहिली. काही क्षणांत (म्हणजे अक्षरशः क्षणात) ती त्यांच्याजवळ येऊन अवकाशात स्थिर झाली. त्यातून दोन यांत्रिक मानव बाहेर पडले व त्यांनी मोडक्यातोडक्या इंग्रजीत या पृथ्वीवासीयांना आपल्याबरोबर चलण्याची विनंती केली. त्या पाचही जणांनी आपल्या अवकाशप्रतिमा अवकाशात ठेवून त्यांच्या यानात आपल्या स्पेसशटलसह व खाद्यपदार्थ व ऑक्सिजनसह प्रवेश केला. तेथे त्यांना त्या ग्रहाची माहिती मिळाली ती अशी :

त्या ग्रहाचे नाव 'यॉल्डा' असून तेथील जवळजवळ सर्व सजीव सृष्टी नष्ट झाली आहे. तेथील सर्व कारभार यंत्रमानवच चालवतात व त्यांनी इतकी प्रगती केली आहे की त्यांनी त्यांच्याजवळच्या चार ग्रहमालांत याने पाठवून त्यांची सर्व माहिती मिळवली आहे. तेथील सजीवांबद्दल सर्व माहिती त्यांनी मिळवली असून त्यांनी विश्वाचे रहस्य जवळजवळ शोधून काढले आहे.

नंतर ते ग्रहावर पोहोचले. तेथे त्यांना परग्रहमाला संशोधनकेंद्र दाखवण्यात आले. तेथे परग्रहमालेतून येणारे संदेश व चित्रे यांचे संकलन केले जात होते व तेथेच त्यांना पृथ्वीविषयीची सर्व माहिती दाखवण्यात आली. तेथील इतर सूर्यमालांतील माहिती संक्षेपाने त्यांना सांगण्यात आली. त्यानुसार इतर तीन मालांपैकी एकीत सजीवसृष्टी असलेला ग्रह नाही, इतर दोहोंपैकी एकीत असणारी सजीवसृष्टी अतिशय प्रगत आहे, तर एकीतली अगदी अप्रगत आहे.

यानंतर त्यांना तो ग्रह दाखवला गेला. तेथे अनेक यंत्रमानव होते. मोटारीप्रमाणे चौकोनी वाहने हवेतल्या हवेत चालत होती व या सर्वांचे नियंत्रण ट्रॅफिक कंट्रोल सेंटरमधून केले जात होते. येथे दिवस-रात्रीचा काळ


विचारता एकाने सांगितले, आमच्याकडे दिवस व रात्र म्हणजे एक पूर्ण दिवस हा २ लिडोंचा असतो व १ लिडो म्हणजे १५ लिका व १ लिका म्हणजे पृथ्वीवरील १० तास. म्हणजे पृथ्वीच्या हिशोबात संपूर्ण दिवस म्हणजे ३०० तास. म्हणजे साधारणपणे पृथ्वीवरील १२ पूर्ण दिवस होय.

या आश्चर्यकारक माहितीनंतर त्यांना परग्रह संशोधनकेंद्रात नेले व तेथे त्यांना अशी विनंती करण्यात आली की, त्यांनी त्या अवकाशप्रतिमा त्या ग्रहावरच—यॉल्डावरच ठेवाव्यात. त्यांना यॉल्डातर्फे एक मोठे स्पेसशटल व १० विचित्र यंत्रे देण्यात आली की ज्यांद्वारे कोणत्याही अतिदूर व्यक्तीशी संवाद साधता येईल व त्यात त्याची प्रतिमा दिसेल. नंतर त्यांना ४ व्हिडियो कॅसेट्स देण्यात आल्या. त्यांत ४ परमालेंतील सजीव सृष्टीची माहिती होती.

अशा तऱ्हेने संपूर्णपणे अभूतपूर्व कामगिरी बजावून भारतभूमीचे लाडके पुत्र पृथ्वीवर सर्वप्रथम दुसऱ्या सूर्यमालेत जाऊन तेथील सजीवांच्या ग्रहावर नुसते जाऊन नाही तर मैत्री करून, सहा प्रकाशवर्षांचे अंतर केवळ नऊ दिवसांत काढून भारतभूमीवर उतरले तेव्हा त्यांचे भले मोठे स्वागत झाले. अख्ख्या जगाने त्यांची वाहवा केली. अशा तऱ्हेने त्या चौघांनी व त्यांचा प्रमुख सुहास याने परस्परसहकार्याने व राजेश पटवर्धनांच्या अभूतपूर्व शोधामुळे पृथ्वीवरील संशोधकांना एका नवीन विषयाचे द्वार खुले करून दिले. राजेश पटवर्धनांचा शोध हा खऱ्या अर्थाने लोकांच्या उपयोगी पडला.

कु. अतुल गणेश दीक्षित
'१' पल्लवी हौसिंग सोसायटी,
शीतल बंगला, शिवाजीनगर,
पुणे ४११ ०१६

२८८८
बा.वा.



# उल्कापात

२२ ऑगस्ट २०६८. इस्रोमध्ये (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन्) आनंदी वातावरण होतं. आज इस्रोच्या स्थापनेला शंभर वर्षं पूर्ण होत होती. १९६८ मध्ये त्या वेळच्या पंतप्रधान मान्यवर श्रीमती इंदिरा गांधी यांनी इस्रोचं उद्‌घाटन केलं होतं. तेव्हापासून आजपर्यंत इस्रोने अवकाश संशोधनात झपाट्यानं प्रगती केली होती. अवकाश-संशोधनाच्या कार्यात इस्रो जगात क्रमांक एकची संस्था होती. इस्रोच्या एकशेएकाव्या वर्धापनदिनानिमित्त आज भारताचे पंतप्रधान इस्रोला भेट देणार होते. सकाळी ठीक दहा वाजता पंतप्रधानांनी इस्रोच्या भव्य वास्तूत प्रवेश केला. प्रदर्शन पाहून व "जीवेत् शरद्ः शतम्" असा आशीर्वाद देऊन साडेअकराच्या सुमारास पंतप्रधान परतले, आवराआवर सुरू झाली आणि इतक्यात....

घाबरलेल्या सुरींदर मुखर्जींनी संचालक विक्रमसिंगांच्या कार्यालयात धाडकन प्रवेश केला. परवानगीही न मागता मुखर्जी आत शिरले. विक्रमसिंग कोणाशी तरी टेलिफोनवरून बोलत होते, तेवढ्यात मुखर्जी आत आले. विक्रमसिंगांनी टेलिफोनच्या ट्रांसमीटरवर हात ठेवला आणि म्हणाले, "येस्, सुरींदरभाई! प्लीज बी सीटेड." सुरींदर मुखर्जी अक्षरशः ओरडलेच, "सर....सर, वुई आर इन डेंजर. वुई आर इन ए क्रिटिकल कंडिशन...सर, आपण वाचू शकणार नाही." विक्रमसिंगांनी किंचितशा

तिरप्या नजरेने सुरींद्र मुखर्जींकडे बघितलं आणि, "हां, हा, येस. थँक यू," असं म्हणत फोन खाली ठेवला.

"बोला, काय म्हणताय? असे घाबरलात का?" विक्रमसिंगांनी विचारलं, सुरींद्रभाईंच्या तोंडावर घामाचे ओघळ दिसत होते. घशाला कोरड पडली होती, समोरचा जार उचलून, ग्लासात पाणी घेऊन दोन घोट पाणी प्यायले, कपाळावरून रुमाल फिरवला आणि म्हणाले, "सर....सर उल्कापात होणार आहे." विक्रमसिंगांनी हसत विचारलं, "एवढंच ना! इटस् नॉट ए सिरियस मॅटर! कोणत्याही सिनीअर ऑफिसरला विचार तो सांगेल काय करायचे ते...." "पण सर....". "अरे घाबरतोस काय! इट विल बी ओ. के."? "सर, पण हा उल्कापात साधा नाहीये. गुरूच्या दोन चंद्रांच्या टकरीमुळे एका उपग्रहाचा ७००० किलोमीटर परीघाचा प्रचंड गोळा पृथ्वीच्या दिशेनं येतोय. वातावरणाच्या घर्षणानं जळेल इतका साधा गोळा नाही तो. सर, आणि त्याचं लक्ष्य आहे भारत आणि त्याच्या मार्गात येताहेत आपले ९८ उपग्रह. सर, वुई कान्ट बेअर दिस् डिझॅस्टर." विक्रमसिंग ऐकून सुन्न झाले. इन्टरकॉमचं बटन ऑन केलं. आणि सर्व तंत्रज्ञांना तातडीनं सभागृहात येण्यास सांगितलं.

बरोबर १२ वाजून ५७ मिनिटं. विक्रमसिंगांनी सभागृहात प्रवेश केला. विक्रमसिंग येताच सर्वजण उभे राहिले आणि विक्रमसिंग खुर्चीत बसताच सर्वजण आपापल्या जागेवर स्थानापन्न झाले. प्रत्येकानं इयरफोन कानाला लावला. सगळीकडे स्मशान शांतता पसरली. सरसर करीत एखादी तलवार फिरावी तसे विक्रमसिंगांचे शब्द ती शांतता भेदत गेले, "मित्र हो! वेळ महत्त्वाची आहे म्हणून थोडक्यात सांगतो. सात हजार किलो-मीटर परीघाचा व मॅनेलियम धातूचे ९२% प्रमाण असणारा एक प्रचंड गोळा पृथ्वीच्या रोखानं येत आहे. त्यामुळे भारत व आजूबाजूच्या १६०० किलोमीटरच्या प्रदेशाला व आपल्या ९८ उपग्रहांना धोका


आहे. १८ तासाच्या आत उल्का पृथ्वीवर कोसळेल. आपल्याला उपाय शोधायचाय." विक्रमसिंग एका दमात एवढं सगळं बोलले.

दोन मिनिटं स्मशान शांतता. दोन मिनिटांनंतर कोपऱ्यात एक हात वर झाला. परत इयर फोन ऑन केल्याचे आवाज आणि नंतर त्या त्या तंत्रज्ञाचा आवाज....

"सर, आता सुसज्ज असलेले नऊ अण्वस्त्रयुक्त उपग्रह जर या गोळ्याच्या मार्गात आणले तर तो गोळा वातावरणातच नष्ट होईल." त्याच-वेळी डॉक्टर दामले उभे राहिले आणि म्हणाले, "सर, पण यामुळे पृथ्वी व तिच्या चंद्राच्या भोवतालच्या वातावरणात तपमानात अचानक वाढ होऊन पृथ्वी अक्षरशः वितळून जाईल." एक उपाय गेला पण पाठोपाठ अजून काही पर्याय उभे राहिले. लेसर किरणांचा उपयोग शक्य होता. पण त्या गोळ्यात मेॅनेलियम या लेसरलाही दाद न देणाऱ्या मूलद्रव्याचा भरणा असल्यानं काहीच उपयोग नव्हता. रिट्रो रॉकेट्स (ज्यामुळे कोणत्याही गतिमान वस्तूचा वेग कमी करता येतो.) चा उपाय उल्केच्या भयंकर गतीने फोल ठरणार होता. मेॅनेलियम काही प्रमाणात चुंबकाकडे आकर्षिले जाते परंतु त्याने फक्त गोळ्याचा वेग कमी होणं शक्य होतं. गोळा सर्वस्वी थांबविणं केवळ अशक्य होतं.

परत पाच मिनिटं भयाण शांतता. पाच मिनिटांनंतर पदार्थविज्ञानतज्ज्ञ विनयकुमार यांनी कृष्णविवर (Black hole) ची कल्पना मांडली. इस्रोच्या काही महत्त्वाच्या शोधांत कृष्णविवराची कृत्रिमपणे निर्मिती हा एक प्रमुख शोध होता. अर्नोलियम किरणांच्या प्रभावाखाली कृष्णविवर निर्माण करता येत असे. एक घनसेंटीमीटरच्या कृष्णविवरात ताशी २००० किलोमीटर गतीने धावणाऱ्या ९०० किलोमीटरच्या परिसरातल्या पृथ्वीएवढ्या वस्तूला ही शोषून घेऊन नष्ट करता येत असे. थोड्याच वेळात विचाराअंती नियोजनासहित योजना मंजूर झाली. फक्त १७ तास उरले होते!

इस्रोकडे प्रत्येकवेळी निरनिराळ्या प्रकारचे दहा उपग्रह सज्ज असत. परंतु कृष्णविवर-वहनासाठी उपग्रहात काही बदल करणं आवश्यक होतं. त्यादृष्टीनं काही बदल तंत्रज्ञांनी केवळ ९० मिनिटात केले. "इन्सॅट–९९ अ" हा उपग्रह उड्डाणासाठी सज्ज झाला होता. तीन वाजून पंचेचाळीस मिनिटं! काऊंट डाऊन सुरू झालं! टेन्, नाईन....फोर थ्री.... टू....वन,....गो....रात्रीचे दोन वाजून अठ्ठावन मिनिटे. पृथ्वीपासून अडीच लाख किलोमीटर अंतरावर उपग्रहाला स्थिर केलं गेलं. फक्त चार तास बाकी. यंत्रमानवांनी कृष्णविवर तयार करण्यासाठी अर्नोलियम टॉर्चेस तयार ठेवले, पण तितक्यात पृथ्वीवरून संदेश आला. थांबा उल्केचा वेग ताशी अठ्ठावीस हजार किलोमीटर आहे, तो ताशी दोन हजार होणं आवश्यक आहे. त्यासाठी अत्यंत प्रभावी चुंबकीय क्षेत्र निर्माण करा."




थोड्याच वेळात; त्या उल्केच्या मार्गात प्रभावी चुंबकीयक्षेत्र निर्माण केलं गेलं. उल्का अजून २० मिनिटातच गोळ्यापर्यंत पोहोचणार होती.

उल्केचा वेग घटायला सुरुवात झाली. बारा मिनिटं उरली असता वेग ताशी ८५०० किलोमीटर पर्यंत घसरला आता फक्त सात मिनिटं, वेग ताशी ५००० किलोमीटर, चार मिनिटं उरली असता वेग होता ताशी ४१०० किलोमीटर, फक्त तीन मिनिटं....अडीच....दोन....दीड....सव्वा ....आता फक्त एक मिनिट! संपूर्ण भारताचं अस्तित्व अवलंबून होतं या एका मिनिटावर, ताशी दोन हजार चारशे किलोमीटर, इस्रोच्या कार्यालयात सर्वांचं लक्ष आपापल्या टेबलावरील टीव्हीकडे लागलं होतं.


हो! फक्त साठ सेकंद! बस्स काय होईल याचा अंदाजच येत नव्हता. घबराट होऊ नये म्हणून उल्का-पतनाची सूचना अत्यंत गुप्त ठेवली होती. इस्रोच्या अडीच हजार तंत्रज्ञांशिवाय कोणालाही ही बातमी माहित नव्हती. फक्त पन्नास सेकंद, वेग दोन हजार तीनशे किलोमीटर वीस सेकंद उरले असता वेग होता दोन हजार दोनशे किलोमीटर, वीस सेकंदात दोनशे किलोमीटर वेग कमी? छे! केवळ अशक्य! तरीही उपग्रहाबाहेर कृष्णविवर तयार ठेवलं. सर्वप्रथम तो उपग्रहच आत शोषला गेला. हे अपेक्षितच होतं. आता फक्त दोन सेकंद वेग दोन हजार शंभर. बस्स! उल्का पृथ्वीवर पडणार. सर्वांनी डोळे मिटून घेतले. आणि काय आश्चर्य, उल्का पृथ्वीच्या रोखानं वळण्याऐवजी कृष्णविवरातच शोषली गेली आणि तिथेच नष्ट झाली. लगेच "इम्सॅट–७६–ब" या उपग्रहाद्वारे कृष्णविवर नष्ट करण्यात आलं. इस्रोत आनंदीआनंद झाला. जगभर बातमी कळविण्यात आली. पण....

पण एक कोडं अजून उमगलं नव्हतं. उल्का कृष्णविवरात कशी शिरली? ताशी दोनहजार एकशे वेग असूनही. सगळी चौकशी झाली. कारण समजेना. एकाएकी मृणाल जोशींना उत्तर सापडले. सभागृहात इयर फोनच्या बटनांचा आवाज झाला. शब्द ऐकू आले. "मित्रहो, हा दैवी चमत्कार खासच नव्हे, परंतु तुमच्या, माझ्या आणि या भारतदेशाच्या भाग्याने त्याचवेळी पृथ्वी व उल्का यांच्या सरळ रेषेतच पृथ्वीचा दुसरा

उपग्रह, दुसरा चंद्र "इंडिया-५८" हा आला आणि त्याच्या गुरुत्वीय बळाने उल्केचा वेग अचानक एक हजार नऊशे पन्नास किलोमीटसपर्यंत घसरला आणि कृष्णविवरात त्याचा पूर्ण नाश झाला" क्षण दोन क्षण निःशब्द शांतता.

प्रत्येक जण विचार करू लागला. मनात विचार आला असेल, मानव श्रेष्ठ की निसर्ग? आणि सगळ्यांनाच या प्रश्नाचं उत्तर सापडलंही असेल.

कु. वामन गजानन पारखी
१४/१९४ लोकमान्य नगर,
महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड,
पुणे ४११ ०३०



५.

# अदृष्य संकट

टिव्हीस्क्रीनसारख्या दिसणाऱ्या–पण मोठ्या पांढऱ्या चौकोनाकडे सर्वांची नजर लागली होती. सर्वांच्या चेहऱ्यावर मूर्तिमंत उत्सुकता डोकावत होती.

ते एकूण पंधरा जण होते. त्यापैकी मध्यभागी, अधिकार दर्शविणाऱ्या खुर्चीवर त्यांचा प्रमुख बसला होता. त्याच्या आजुबाजूला सात-सात असे करून सर्व जण गोलाकार बसले होते.

आता ते ज्या हॉलमध्ये बसले होते, ती इमारत त्या ग्रहाच्या पोटात, गाभ्यात होती. पृष्ठभागावर जाण्यासाठी लिफ्टसारख्या पण अती वेगवान साधनांचा उपयोग करण्यात येत होता. त्या इमारतीत त्या ग्रहाची सारी शक्ती एकवटली होती. त्या ग्रहाचा स्वामी–तो प्रमुख पडद्या समोर बसला होता.

—आता त्याची नजर समोरच्या दृश्यावर होती....दोन महिन्यांपूर्वी त्यांनी पाठविलेलं 'लिटाका-ए' यान आपल्या इच्छित लक्षावर स्थिरावलं होतं....

—त्याचा वेग किती तरी प्रकाशवर्ष होता. म्हणून ते अतिदूरवरच्या सूर्यमालेतल्या एका ग्रहावर केवळ एका महिन्यात पोहोचलं होतं. त्यातले निद्रा घेणारे दोन प्रवासी आता, यानातील एका यंत्राद्वारे विचित्र

ध्वनीमाऱ्यामुळे जागे झाले होते. त्यांना देण्यात येणाऱ्या इंजेक्शनचा परिणाम, या विचित्र ध्वनींमुळे नाहीसा झाला होता. नाहीतर—ते लाखो वर्षे तसेच चिरनिद्रेत राहिले असते....

सारे जण आता दुप्पट उत्सुकतेने चौकोनाकडे बघू लागले....

....यान एका पांढऱ्या भूप्रदेशावर स्थिरावलं होतं. यानाचं छोटसं दार उघडून पहिला प्रवासी उतरला. त्याने नखशिखांत स्पेससूट पेहेरला होता. त्याच्या पाठोपाठ दुसऱ्या प्रवाश्यानं भूमीवर पाय ठेवला. त्यांनी आजुबाजूची पाहाणी केली. थोड्या वेळानं यानानं हवेत अलगद झेप घेतली आणि त्या ग्रहाभोवती, पण उंचीवरूनच घिरट्या मारायला सुरवात केली. त्याच्या तळाला बसवलेल्या शक्तीशाली कॅमेऱ्याने आपल्या कार्याला सुरुवात केली.

....पडद्यावर तो ग्रह जवळ आला....

—आणि चौकोनासमोर बसलेल्यांच्या तोंडातून आश्चर्योद्गार निघाले.


त्या ग्रहावरची सजीव सृष्टी पडद्यावर झळकत होती.—

'हं! म्हणजे या प्रचंड अवकाशात आपल्या व्यतिरिक्त सजीव आहेत तर!' खुर्चीतला प्रमुख रागानं उद्गारला. त्याच्या अपेक्षित कल्पनेला तडा गेला होता.

—पण थोड्याच वेळात त्याच्या क्रूर चेहऱ्यावर आसुरी आनंद विलसू लागला.

कारण—आतापर्यंत त्याने, स्वतःच शोधून काढलेले कित्येक सृष्टी नसलेले ग्रह अति-स्फोटके वापरून उडवले होते. समोरच्या पडद्यावर, ग्रहांच्या ठिकऱ्या उडतानाचे दृश्य पाहून त्याला विलक्षण आनंद वाटत असे. आपल्या खास यंत्रणेला राबवून तो हे दृश्य बघत असे.

प्र. क्र. २७९८ दिनांक
बा.वा.



आणि आता तर या ग्रहावर जीवसृष्टी होती ! या ग्रहाचा नाश करताना त्याला जास्त आनंद वाटणार होता—

'माझा अंदाज खरा ठरला,' बाजूला बसलेला अवकाश-तज्ञ ओरडला. प्रमुखाची विचारमाला तुटली. याच अवकाश-तज्ञाच्या सल्ल्यानुसार त्याने हे यान पाठवले होते.

'हो ! तुझा अंदाज खरा ठरला.' प्रमुखाने कबुली दिली. असा मान सहसा कुणाला मिळत नसे.

नंतर प्रमुखाने एक यंत्र हातात घेऊन यानाला आज्ञा केली, 'त्वरित परत या. पण परत येताना त्या ग्रहावरच्या जीवांना आपल्या शक्तीची चुणूक दाखवून या !' असं म्हणून त्याने एक बटण दाबलं. समोरचे दृश्य अदृश्य झालं.

▫ ▫

आता तो प्रमुख अवकाश-तज्ञाला घेऊन आपल्या खास विभागात आला. त्या संपूर्ण ग्रहाची शक्ती या विभागात साठवलेली होती. निरनिराळी यंत्रं, कॉम्पुटर्स इत्यादींनी सुसज्ज असा हा विभाग होता.

एका खोलीचं दार उघडून दोघे आत आले. 'हाच तो मी शोधून काढलेला प्रचंड स्फोट पावणारा पदार्थ. याच्या स्फोटामुळे कितीही मोठा ग्रह नष्ट होतो.' प्रमुख प्रथम त्याला हे सांगत होता. त्यांच्या समोर कसल्यातरी धातूचा खोका होता. प्रमुख माहिती सांगू लागला, 'याच्या-वरचं हे लाल बटण दाबलं की एका तासात प्रचंड स्फोट होतो, आणि सारं बेचिराख होतं.'

'कमाल आहे !' अवकाश-तज्ञ पुटपुटला.

'आणि ह्याचा प्रयोग तुला दोन महिन्यांनंतर दिसणारच आहे !'

'काय ? म्हणजे जीवसृष्टी असलेल्या त्या ग्रहाला तुम्ही उडविणार ?'

'हो ! सृष्टी असलेला हा ग्रह बेचिराख होताना मजा येईल', असं म्हणून प्रमुख खदखदा हसू लागला. अवकाश-तज्ञ हादरला. सृष्टी असलेला गृह बेचिराख करायच म्हणजे किती नीच कृत्य होतं ते !

पण तो काहीच बोलला नाही. प्रमुखासमोर बोलायची प्राज्ञाच नव्हती. लोकसंख्या कमी असावी म्हणून त्याने आपल्या ग्रहावर अवघ्या हजार व्यक्ती जिवंत ठेवल्या होत्या.

थोड्यावेळानंतर अवकाश-तज्ञ तिथून निघून गेला. त्याच्या मनात विचारांचा मोहोळ उठला होता—

प्रमुख केवळ आपल्या नेत्रसुखासाठी, मानसिक सुखासाठी एका जीवसृष्टीला, नष्ट करणार होता. त्या अनाहूत ग्रहाला वाचवायला हवं होतं. तिथली जीवसृष्टी अमर राहायला हवी होती.

....असं त्या सृष्टीविषयी आपल्या मनात प्रेम का निर्माण व्हावं हे त्याचे त्यालाच कळेनासं झालं; कदाचित प्रमुखाच्या अरेरावी आणि हुकुमशाही मुळेही असं झालं असेल, पण त्याने त्या नव्या ग्रहाला वाचवायचा निश्चय केला.


पंधरा दिवस त्याच्या मनात उलट-सुलट विचारांचे काहूर उठले, पण प्रमुखाविषयी राग म्हणा, काही म्हणा त्याने आपला निश्चय पक्का केला.

□ □

महिन्यानंतर यान परतलं. त्याचदिवशी अवकाश-तज्ञाच्या यानानं वातावरणात झेप घेतलेली होती. त्याचा निश्चय त्याने पुरा केला होता. स्फोटकाचं लाल बटन त्यानं दाबून ठेवलं होतं, त्या खोलीत प्रचंड स्फोट होणार होता, पर्यायाने त्या ग्रहाच्या, स्वतःच्या ग्रहाच्या ठिकऱ्या उडणार होत्या. पण त्या ग्रहाबरोबरच तो क्रूरकर्मा प्रमुख नष्ट होणार होता....

यानात बसण्यापूर्वी अवकाश-तज्ज्ञाने, ते निद्रेचं इंजेक्शन घेतलं होतं. यानाने झेप घेतली तेव्हा तो पूर्ण निद्रिस्त झाला होता. महिन्याने त्याचे यान त्या अनाहूत ग्रहावर पोहोचणार होतं, त्यापूर्वीच विशिष्ट ध्वनी मान्यामुळे तो जागा होणार होता. तासाभरात तो कित्येक प्रकाशवर्षे दूर जाणार होता....

—आणि तासाभराने अवकाशात त्या ग्रहाचा प्रचंड स्फोट झाला. त्याचा हादरा सान्या अवकाशाला जाणवला....



क्रूर प्रमुख नष्ट झाला, स्वतःच्या शोधानेच त्याचा व त्याच्या ग्रहाचा बळी घेतला होता....

पण याचा विपरित परिणाम झाला—अवकाशाला बसलेल्या धक्क्याने, अवकाश-तज्ज्ञाच्या यानात मोठा फेरफार झाला....

दिशादर्शकाची कार्यपद्धती संपली....ध्वनींचा मारा करणारं यंत्र पूणपणे बिघडलं होतं....आता अवकाश-तज्ञाचं यान कुठेतरी भरकटत जाऊन, कुठल्यातरी तारकापुंजाच्या भोवती घिरट्या घालत राहाणार होतं... याच्यातला अवकाश-तज्ञ चिरनिद्रा घेत राहाणार होता.

□ □

जो-तो वर्तमानपत्रात डोकावत होता. हेड-लाईनवरची बातमी सर्वांची नजर वेधून घेत होती.

आसाममधल्या एका जंगलात, वसंत ऋतू असूनही एका विशिष्ट गोलाकार, मैलभराच्या टापूतील झाडांची पाने एकाकी वाळून गेली, पण मर्यादेच्या, आजूबाजूच्या झाडांची पाने जशीच्या तशीच आहेत.

शास्त्रज्ञ अधिक तपास करीत आहेत....

शास्त्रज्ञांनी हे गूढ उकण्याचा खूप प्रयत्न केला, पण ते अपयशी ठरले.

त्यांना काय माहीत, कुठल्यातरी अती दूरच्या सूर्यमालेतल्या एका ग्रहावरच्या यानाची ही करामत होती !

□ □

कु० अजय कमलाकर बेलन
साने गुरुजी पथ, गुरुवार वॉर्ड,
मालेगांव–४२३ २०३ (जि० नाशिक)

२७९९
बा. वा.

# बाल कुमार वाचकांसाठी पुस्तकेच पुस्तके

## छोट्यांसाठी मोठ्याटाईपाची सचित्र पुस्तके

* बालपंचतंत्र १ ते ५, थोरात * छान गोष्टी १ ते ७, मालतीबाई दांडेकर *
* गोष्टींचा तास १ ते ११, वैद्य * बाल कल्पना रम्यकथा १ ते ३, बाललेखक *
* मनोरंजक नीतिपाठ १ ते ४ वैद्य * नवलकथा १ ते ९, गो. वि. रानडे *
* बाल हितोपदेश, मनोहर * सुरस गोष्टी, वैद्य * मौजेच्या गोष्टी, ग. म. वैद्य. *

## कुमारांसाठी मनोरंजक व बोधप्रद पुस्तके

* मनोरंजक सुबोध गोष्टी १ ते ६, पाटणकर * सदाशिव शेलार, इंगवले *
* सानेगुरूजींच्या गोड गोष्टी १ ते १० * दिन्या मिनीची धमाल, सौ. देशपांडे, *
* गोट्या भाग १ ते ३, चिंगी, खडकावरला अंकुर, ना. धों. ताम्हनकर *
* गणितातील गमती, वा. मो. कोळेकर * तरूण रजपूत सरदार, नाथमाधव *
* सिंहासन बत्तिशी, घैसास * बुद्धिचातुर्यकथा आणि शौर्यकथा १ ते १८ अभ्यंकर *

## अध्यात्माची आवड निर्माण करणारी संतचरित्रे

* राष्ट्रगुरू समर्थ रामदास, महाजन * अक्कलकोट स्वामी महाराज, मालपाठक *
* शेगावचे गजानन महाराज, मालपाठक * स्वामी मुक्तानंद, वसंतराव मालपाठक. *
* स्वामी विवेकानंदांची गोष्ट, वैद्य * रामकृष्ण परमहंसाची गोष्ट, वैद्य. *
* स्वामी नित्यानंद, स्वामीस्वरूपानंद, शांताराम थत्ते * जे. कृष्णमूर्ती, कृष्णप्रेमी. *

## पाश्चात्य वाङ्मयाचे मराठीत सुरेख रूपांतर

* रॉबिनहुड आणि त्याचे रंगेलगडी, भा. रा. भागवत * डॉन क्विक्झोट, शिखरे *
* तीन शिलेदार, सौ. उषा आपटे, * वीस वर्षानंतर, सौ. उषा आपटे, *
* बाल अरेबियन नाइट्स १ व २ त्र्यं. पु. थोरात * ऑलिव्हर ट्विस्ट, आपटे *
* गलिव्हरचे प्रवास, भा. म. गोरे * रॉबिन्सन क्रूसो, वि. स. सुखठणकर *
* सिंदबादच्या ७ सफरी, अ. वा. मराठे * पुढे व्हा! १ ते ३, यदुनाथ थत्ते. *

संपूर्ण यादी मागवावी. विनामूल्य पाठविण्यात येते.

**केशव भिकाजी ढवळे**

श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई ४०० ००४.


BVBK-0402798

